# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०२/०३/२०२६ (सोमवार )

## एसबीएल एनर्जी लिमिटेड, राउळगाव या कंपनीत झालेल्या स्फोट प्रकरणी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंद, ११ आरोपी अटक

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :—** दिनांक ०१/०३/२०२६ रोजी सकाळी ०६:०० ते ०७:०० वाजेच्या सुमारास मौजा **राउळगाव येथील** खाणकाम व औदयोगिक कामासाठी स्फोटके निर्माण करणारी **एसबीएल एनर्जी लिमिटेड, या** कंपनीतील बिल्डींग क्रं १६ (बी) मध्ये स्फोट झाला होता. सदर सदर दुर्घटनेत १९ जणांचा मृत्यु झाला असुन २३ जण जखमी आहे. **Directorate of Industrial Safety and Health (DISH) आणि Petroleum and Explosive Safety Organisation (PESO) चे आधिकारी यांनी कंपनीकडुन नियम व शर्तीचे पालन न केल्याबाबतचा प्रथामिक तपासणी अहवाल सादर केलेला आहे. त्यानुसार पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कंपनी प्रशासना** विरुदध कलम १०५ भान्यासं (सदोष मनुष्यवध) , १२५ (ए) (बी) भान्यासं (इतरांचे जिवीत किंवा व्यक्तीगत सुरक्षीतता धोक्यात आणणारी कृती,) २८८ भान्यासं ( स्फोटक पदार्था बाबत निष्काळजीपणे वर्तन) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**सदर गुन्हयातील आरोपी १) चंद्रशेखर ब्रिजमोहन रजवाड, वय ५८ वर्षे, रा. ५०२ रचनाजी अपार्टमेन्ट, अंबाझरी, नागपुर (व्हाईस प्रेसिडन्ट) ,२). संदीप हिम्मतलाल सोलंकी, वय ६२ वर्षे, रा. ६४,६५ महाराणा बिल्डर, काटोल रोड,नागपुर (सिनीयर जनरल मॅनेजर), ३). प्रदीप रघुनाथ शर्मा, वय ५७ वर्षे, रा प्लॉट क्रं ५७ जयविघ्नहर्ता सोसायटी, काटोल रोड, नागपुर. (जनरल मॅनेजर), ४). रोशन भास्करराव राउत, वय ४३ वर्ष , रा दत्तवाडी, नागपुर, (प्रोडक्शन मॅनेजर), ५). निलकलम ठाणीराम डोंगरे, वय ४८ वर्षे, रा. वासंती**

**आपर्टमेंट,आकांक्षी सोसायटी दाभा, नागपुर, ( प्रोडक्शन मेनेजर — फिलींग / फ्रेमिंक डिटोनेटर कसे भरावे व प्रेस कसे कारावे याचे प्रशिक्षण), ६). पंकज रामनरेश पांडे, वय ३२ वर्ष, रा. प्लॉट क्रं ३०३ बेसा, नागपुर (प्रोडक्शन सुपरवायझर), ७). सुधाकर रमेश उपरकर, वय ४३ वर्ष, रा. कोहळी, ता.कळमेश्वर (लोडिंग सुपरवायझर), ८). राजेन्द्र देवराव पारधी, वय ४२ वर्ष, रा. डोरली (भिंगारे) कळमेश्वर (बिल्डींग १६ (ए) जबाबदारी) , ९). विलास अंकुश माळवे, वय ४५ वर्षे, रा. चिटणीस नगर, नागपुर (बिल्डींग १६ (बी) जबाबदारी) यांना दिनांक ०१/०३/२०२६ रोजी ताब्यात घेवुन अटक करण्यात आली आहे. सर्व ९ अटक आरोपींचा दिनांक ०२/०३/२०२६ ते दिनांक ०७/०३/२०२६ रोजी पर्यंत असा ६ दिवस पोलीस कोठडी रिमांड मंजुर झाला आहे.**

**सदर गुन्हयातील आरोपी क्रं १०) रवि प्रकाशचंद्र कामरा, वय ६५ वर्षे, रा. एन डी १३५ सेक्टर क्रं ५, देवेंद्र नगर, रायपुर , राज्य छत्तीसगढ (कंपनी संचालक) आणि आरोपी क्रं ११) राकेश सुदर्शन तिवारी, वय ६१ वर्षे, रा. ४०१, पेबेल ७, नर्मदा कॉलनी, काटोल रोड, नागपुर (कंपनी संचालक) यांना ताब्यात घेतले आहे. दोन्ही आरोपींना अटकेची प्रक्रीया सुरू आहे.**

## ५१२ ग्रॅम गांजा सह ३२ हजार ७०० रूपयांचा मुद्देमाल जप्त, आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद, आरोपी अटक स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— दिनांक ०१/०३/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस ठाणे कळमेश्वर परीसरात पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, कळमेश्वर वार्ड क्रं ५ येथे एक महीला आरोपी ही गांजा विक्रीचा व्यवसाय करत आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस पथकाने आरोपी क्र. १) महिला आरोपी हिचे राहते घरी मौजा कळमेश्वर, वार्ड क्र ५ येथे धाड टाकुन पंचासमक्ष घरझडती घेतली असता अंमली पदार्थ गांजा मिळून आला. महीला आरोपी हीला अधिक विचारपुस केली असता तिने सांगितले की, मिळुन आलेला गांजा तिचा भाउ आरोपी क्र. २) विजय दिगंबर महाजन, रा. कळमेश्वर आणि त्याचा साथीदारा यांनी विक्री साठी आणलेला आहे.

पोलीसांनी आरोपीच्या ताब्यातुन १) अंमली पदार्थ गांजा वजन ५१२ ग्रॅम किंमती २५,६००/— रूपये २) गांजा पॅकिंग करिता वापरण्यात येणाऱ्या मोठ्या लहान आकाराच्या प्लास्टिक पिशव्या किंमती १००/— रुपये ४) एक अँड्रॉइड मोबाईल किंमती ७०००/—रूपये असा एकुण ३२,७००/— रूपयांचा मुद्देमाल आरोपींकडुन जप्त केला आहे.

**नमुद प्रकरणी आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम ८(क), २० (ब) (ii) ,२२,२९ एन.डि.पि.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. साखळी पुरावे जोडुन पोलीस अधिक तपास करीत आहे.**



## खुनाच्या गुन्हयातील आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली शिक्षा आजीवन कारावासाची शिक्षा

**पो.स्टे. भिवापूर** :— फिर्यादी नामे सौ. सुगंधा विश्वनाथ गजघाटे, वय ३८ वर्ष, रा. तातोली यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भिवापूर येथे अप क्र. २५८/२०२२ कलम ३०२ भादंवि

सहकलम ३(२), (V) अनुसुचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, दिनांक २०/०७/२०२२ रोजी मौजा तातोली येथे यातील फिर्यादीचा मृतक मुलगा नामे विशाल विश्वनाथ गजघाटे, **वय २५ वर्ष यास आरोपी नामे सुरज शालीकराम कामडी, वय २३ वर्ष, रा. तातोली** याने त्याच्या आई सोबत फिर्यादीचे मृतक मुलाचे अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरून फिर्यादीच्या मुलास कुऱ्हाडीने मानेवर व डोक्यावर मारून जिवानीशी ठार केले.

श्री भिमराव टेळे, उपविभागीय पोलीस अधिकारी,उमरेड यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. आज दिंनाक ०२/०३/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश १४ श्री. जहीर अब्बास शेख यांनी **नमुद आरोपी नामे सुरज शालीकराम कामडी, वय २३ वर्ष, रा. तातोली यास कलम ३०२ भादंवि मध्ये आजीवन कारावास व १०,०००/—रूपये दंड, दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावास कलम अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा ,३(२), (V) मध्ये आजीवन कारावास व १०,०००/—रूपये दंड, दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्री. प्रशांत साखरे यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्रीमती वृष्टी जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड , पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण,सपोनि श्री जयप्रकाश निर्मल, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन भिवापुर, सपोनि श्री विशांत नांदगाये, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण यांनी महत्वपुर्ण योगदान दिले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन श्रेणी पोलीस उपनिरीक्षक तुलाराम खडसे यांनी मदत केली आहे

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## वाहनासह ३० लाख ५० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
## २ आरोपी अटक
## उपविभागीय पोलीस अधिकारी, कन्हान यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक ०१/०३/२०२६ रोजी श्री. संतोष गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग हे आपल्या स्टाफसह पेट्रोलींग करीत असता त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी सतर्क पेट्रोलींग केली असता पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत मौजा सोनेगाव शिवार भोवरी रोड येथे संशयीत टिप्पर गाडी क्र. एम एच— ४० सि डब्ल्यु ९७९६ मिळून आल्याने वाहन चालकास वाहन थांबविण्याचा इशारा केला. परंतु वाहन चालकाने वाहन न थांबविता भोवरी कडे पळ काढला. पोलीसांनी शिताफिने पाठलाग करून भोवरी शिवारात नमुद वाहनाला थांबविले. पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन **चालक आरोपी क्रं १) योगेश संजय राईकवार, रा. आंबेडकर चौक, कन्हान ता. पारशिवनी हा मिळुन आला. त्याला वाहन मालकाचे नाव विचारले असता वाहन मालक आरोपी क्रं २) शुभम गुणवंत रडके, रा. कामठी रोड, भिलगाव अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली.** तसेच पोलीसांनी आरोपी चालकास रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. वाहन चालकाने माहीती दिली की, वाहन मालक यांच्या सांगण्यावरून तो अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करतो. **पोलीसांनी पंचासमक्ष १) टिप्पर वाहन क्र एम एच ४० सि डब्ल्यु ९७९६ किंमती ३०,००,०००/—रूपये २) १० ब्रास रेती किंमती ५०,०००/— रूपये असा एकुण ३०,५०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोस्टे मौदा येथे कलम ३०३ (२), ३(५), ४९ भा.न्या.सं २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी नमुद गुन्हयातील दोन्ही आरोपी यांना अटक केली आहे.**




## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## २२ जनावरांची सुटका, वाहनासह ३२ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त
## देवलापार पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन देवलापार** :— दिनांक २८/०२/२०२६ रोजी देवलापार पोलीसांना माहीती प्राप्त झाली की, अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. अशी माहीती मिळताच पोलीसांनी सदर वाहन शोध कामी जुने देवलापार पोलीस स्टेशन समोर नाकाबंदी केली. नाकाबंदी दरम्यान एक संशयीत १२ चक्का कंटेनर वाहन कमांक एच आर ६७ सी १००५ हे वाहन दिसुन आले. पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली असता **१) चालक आरोपी नामे मोहम्मद जुबेर मोहम्मद लायक, वय ३२ वर्ष, रा, जामा मज्जीद जवळ भोजपुर ता. जि. मुरादापुर (उ.प्र.) आणि क्लिनर आरोपी नामे २) मोहम्मद रशीद मोहम्मद हनीफ, वय**

**५० वर्ष, रा. काजीवाडा आझाद चौक, शामली ता. जि. शामली (उ.प्र.) हे मिळुन आले.** पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये २२ हले/रेडे जनावरे मिळुन आले. नमुदजनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून १२ चक्का कंटेनर वाहन कमांक** एच आर ६७ सी १००५ **किंमती २०,००,०००/— रूपये आणि २२ हले/रेडे जनावरे किंमती १२,१०,०००/— रूपये असा एकुण किंमती ३२,१०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला.**

नुमद प्रकरणी आरोपीतांविरूध्द कलम ३(५) भान्यासं आणि प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम कलम ११(१)(डी)(इ)(एच) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **आरोपींना अटक करण्यात आली आहे.**



# अवैधरित्या देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ५४ हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त, कन्हान पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक ०१/०३/२०२६ रोजी कन्हान पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मोटरसायकलने **अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक केली** जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ आंबेडकर चौक येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान हिरो होंडा एच. एफ डिलक्स मोटारसायकल क्र एम. एच ४० आर ४४९६ ही मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता आरोपीच्या जवळ असलेल्या खोक्यात देशी दारू मिळुन आली. **आरोपी नामे विशोद विश्वेश्वर पात्रे, वय २५ वर्ष, रा. वाघधरेवाडी कन्हान हा अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी दारूच्या १०० निपा किंमती ४०००/— रूपये २) एक हिरो होंडा एच. एफ डिलक्स मोटार सायकल क्र. एम. एच ४० आर ४४९६ किंमती ५०,०००/— रूपये असा एकुण किंमती ५४,०००/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०९ गुन्हे नोंद

दिनांक ०१/०३/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, मोहाफुल रसायन सडवा, साहित्य तसेच वाहन असा एकुण ८२,३४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०९ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे परनाला रामचंद्र पवार, वय ४८ वर्ष, रा. दहेगाव पारधीबेडा याचे वर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे पुन्यवान श्रीराम पाटील, वय ४९ वर्ष, रा. कुही, ता. कुही जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन अरोली** येथे आरोपी नामे चक्रधर राघोबा लेंडे, वय ६० वर्षे, रा. कोदामेंढी, ता. मौदा, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी क्र. १) नामे राजकुमार उर्फ अनवर मनोहर चव्हान, रा. आमगाव, ता. रामटेक. जि. नागपुर २) अशोक डहारू कठौते, रा. पाचगाव दफाई खैरी बीजेवाडा, ता. रामटेक, जि. नागपुर याचे वर प्रत्येकी एक गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद,**पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी नामे रमेश शिरपत ईनवाते, वय ७० वर्ष, रा. चोरबाहुली, ता. रामटेक याचे वर एक गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन पारशिवनी येथे आरोपी नामे बिसन बळवंता मेश्राम, वय ४१ वर्ष, रा. वार्ड क्र. २, नयाकुंड ता. पारशिवनी याचे वर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी क्र. १) नामे आकाश बापुराव नेवारे, वय २६ वर्ष, रा. नयाकुंड, ता. पारशिवनी २) विशोद विशेश्वर पात्रे, वय २५ वर्ष, रा. वाघधरेवाडी कन्हान याचे वर प्रत्येकी एक गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद अशा आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ०९ गुन्हे दाखल केले आहे.

**नमुद कारवाईत एकुण १) ८० लिटर मोहाफुल गावठी दारू, ४५० लिटर मोहाफुल रसायन सडवा व साहित्य २) १२९६० मिली देशी दारू व वाहन असा एकुण ८२,३४०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने